MHSO110037482012

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २०.१२.२०१२ |
| नोंदणी तारीख | : | २०.१२.२०१२ |
| निकाल तारीख | : | २३.०३.२०२६ |
| कालावधी | : | व. म. दि.<br>१३ ०३ ०३ |

**४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात**.
(पिठासीन अधिकारी : एम. जे. गायकवाड )

**नियमित दिवाणी दावा क्र. १५८४/२०१२** **नि.क्र. ६१**

०१ **नानासो विठ्ठल जाधव** )
वय :- ३७ वर्षे, व्यवसाय :- शेती, )

०२ **हनुमंत विठ्ठल जाधव** )
वय :- ३२ वर्षे, व्यवसाय :- शेती, )

दोघे राहणार :- एकशिव, ता. माळशिरस, जि. )
सोलापुर. ) **...वादी**

**विरुद्ध**

०१ **जगन्नाथ कृष्णा सावंत (मयत)** )

०१ **दिलीप जगन्नाथ सावंत** )
वय :- ५० वर्षे, व्यवसाय :- शेती, )

०२ **नामदेव जगन्नाथ सावंत** )
वय :- ४८ वर्षे, व्यवसाय :- शेती, )

०३ **मधुकर जगन्नाथ सावंत** )
वय :- ४६ वर्षे, व्यवसाय :- शेती, )

०४ **हिराबाई जगन्नाथ सावंत** )
वय :- ७० वर्षे, व्यवसाय :- शेती, )

०५ **शालन निवृत्ती दरेकर** )
वय :- ४४ वर्षे, व्यवसाय :- शेती, )

०६ **विमल प्रल्हाद बागल** )
वय :- ४२ वर्षे, व्यवसाय :- शेती, )

प्रतिवादी क्र १ ते ४ राहणार :- दहिगांव, ता. माळशिरस, जि. सोलापूर )

प्रतिवादी क्र ५ राहणार :- वडगांव (निंबाळकर), ता. बारामती, जि. पुणे )

प्रतिवादी क्र ६ राहणार :- पिंपळ, ता. इंदापुर, जि. पुणे ) **...प्रतिवादी**

---

वादीतर्फे विद्वान विधिज्ञ - ॲड. जी. पी. कदम

प्रतिवादी क्र. १ ते ६ तर्फे विद्वान विधिज्ञ - ॲड. आर. एस. बर्गे

---

**न्यायनिर्णय**

(घोषीत दिनांक २३.०३.२०२६)

वादीने सदरचा दावा हा दावा जमीन व मिळकतीचे मृत्युपत्राने मालक आहेत असे जाहीर होवून मिळावे तसेच वादीच्या वहिवाटीला हरकत उडथळा करु नये अशी निरंतरची ताकीदीसाठी दाखल केला आहे.

**०२. दावामिळकतींचे वर्णन :-** तुकडी सोलापूर पोट तुकडी व तालुका माळशिरस पैकी मोजे दहिगाव येथील मिळकत.

**अ)**

| **गट नंबर** | **क्षेत्र हे. आर** | **आकार रू. पै.** |
|---|---|---|
| **९३/३** | १-२७ | ०.६५ |
| **९३/३अ पैकी** | ०-५४ | ०.४० |

**ब)** मौजे दहिगाव येथील सि.स.नं २६९ क्षेत्र २०६.२ चौ.मी. संपूर्ण वरील वर्णनाची मिळकत इतर तदंगभुत वस्तुंसहीत **(या पुढे उपरोक्त नमुद मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येते.)**

**०३.** दावा मिळकत ममताबाई धोंडी सावंत हिच्या मालकी वहिवाटीची असून त्या दिनांक २०/८/२०१२ रोजी मौजे एकशिव येथे मयत झाल्या आहेत. मयत ममताबाई धोंडी सावंत हिचे पतीसुध्दा पूर्वीच मयत झाले आहेत. तसेच मयत ममताबाई व धोंडी यांना कोणतेही अपत्य झाले नाही. त्यामुळे त्यांना जवळचे कोणीही वारस नाहीत. वादीचे वडील विठ्ठल जाधव हे मयत ममताबाई हिचे भाचे आहेत. ममताबाईंचे पती मयत झालेनंतर ममताबाई ही वादींच्या वडीलांकडे येवून राहिल्या. त्यामुळे ममताबाई हिचा संपूर्ण सांभाळ वादीचे वडील व वादी यांनी केले आहे. वयोमानानुसार तिला शेतीची कामे होत नसल्याने ती दावा मिळकती वादींकरवी कसत होती.

**०४.** वादींनी मयत ममताबाई हिचा अतिशय व्यवस्थितपणे सांभाळ केला असल्यामुळे ममताबाई हिस वादींबद्दल प्रेम व लळा उत्पन्न झाला होता. ममताबाई हिस कोणीही जवळचे वारस नसल्यामुळे ममताबाईने तिच्या अंतिम इच्छेप्रमाणे व मर्जीप्रमाणे दाव्यात वर्णन केलेल्या मिळकती व शेती महामंडळाकडून परत मिळणा-या मिळकतीचे दिनांक ३०/१२/२००८ रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र साक्षीदारांसमक्ष करुन ठेवले आहे. त्याप्रमाणे दुय्यम निबंधक माळशिरस यांच्याकडे दस्त नं. ३१९४/२००८ प्रमाणे सदरच मृत्युपत्र नोंदलेले आहे. तसेच ममताबाई ही पूर्वीपासून वादीकडे मौजे एकशिव येथे राहणेस होती. त्याप्रमाणे ममताबाईची सर्व सार्वजनिक कागदपत्रे, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, आधार कार्ड वगैरे सर्व कागदपत्रे मौजे एकशिव येथील आहेत. तसेच वादींनी ममताबाई हिच्या मृत्युची नोंद सुध्दा एकशिव ग्रामपंचायतीकडे केली आहे. मयत ममताबाईचा आधार कार्डावरील कुटुंबाचा फोटो वादी यांचे कुटुंबासोबत आहे. तसेच ममताबाई मयत झाल्यानंतर तिचे सर्व अंतिम विधी मौजे एकशिव येथे वादी यांनी केले आहेत.

**०५.** दिनांक ३०/१२/२००८ रोजीच्या नोंदणीकृत मृत्युपत्राने वादी हे दावा मिळकतीचे मालक झाले असून ते दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस

आहेत. प्रतिवादी व मयत ममताबाई यांचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी हा मयत ममताबाई हिच्या कुटुंबातील नाही. प्रतिवादी हा मयत ममताबाईचा पुतण्या नाही. तो मयत ममताबाई हिचे दुरचे आडनावातील भावकीतील आहे. मयत ममताबाई हिचा प्रतिवादीने कधीही सांभाळ केलेला नाही किंवा मयत ममताबाई ही कधीही प्रतिवादीकडे राहणेस नव्हती. परंतु मयत ममताबाई हिस जवळचे कोणीही वारस नाही असे पाहून यातील प्रतिवादीने दहिगाव गावातील काही राजकीय पुढा-यांना हाताशी धरुन मयत ममताबाईच्या मृत्युची नोंद करुन घेतली आहे. तसेच काही राजकीय पुढा-यांकडून वेगवेगळे दाखले घेतलेले आहेत. मयत ममताबाई हिचा पुतण्या म्हणून दावा कलम १अ यात वर्णन केलेल्या जमीनीबाबत खोटे प्रतिज्ञापत्र केलेले आहे. वास्तविक प्रतिवादीची सर्व कागदपत्रे खोटी व बनावट असून केवळ दावा मिळकती हडप करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहेत.

**०६.** वास्तविक ममताबाई ही दहिगाव येथे राहणेस नसल्यामुळे प्रतिवादीचे कागदपत्रे ही खोटी व बनावट असल्याचे दिसून येतात. त्याचप्रमाणे वादींनी दिनांक ३०/१२/२००८ रोजीच्या नोंदणीकृत मृत्युपत्राच्या आधारे गावच्या दप्तरी दावा जमीनी ७/१२ सदरी मयत ममताबाई हिचे कायदेशीर वारस म्हणून नोंद होणेसाठी तहसिलदार माळशिरस यांच्याकडे दिनांक २०/१०/२०१२ रोजी अर्ज दिलेला आहे. त्याप्रमाणे वादीकडे त्याची पोहच आहे. मात्र प्रतिवादीने राजकीय पुढारी व महसुल अधिकारी यांना हाताशी धरुन व त्यांच्याकडे खोटी व बनावट कागदपत्रे देवून फेरफार नं.६९४३ ने दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी त्याच्या नावाची बेकायदेशीरपणे नोंद करुन घेतलेली आहे. वास्तविक सदर नोंद करताना संबंधीत महसुल अधिकारी यांनी प्रतिवादींकडून कोणत्याही सक्षम न्यायालयाचा वारस दाखल घेतला नाही. प्रतिवादीने दाखल केलेल्या कागदपत्राची शहानिशा केली नाही. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम मधील तरतुदीचे कोणतेही पालन न करता नोंद बेकायदेशीरपणे अस्तित्वात आणली आहे. मयत ममताबाई हिच्या वारसांबाबत अथवा दस्तऐवजांबाबत महसुल अधिकारी यांनी

कोणतीही स्थानिक चौकशी केली नाही. अशाप्रकारे प्रतिवादीने महसुल अधिकार-यांना हाताशी धरुन दावा मिळकती हडप करण्याचा प्रयत्न केला आहे.

**०७.** मुळात फेरफार नं.६९४३ ही नोंद बेकायदेशीर आहे. सदर नोंदीने प्रतिवादीला कोणताही हक्क व अधिकार प्राप्त होवू शकत नाही किंवा वादींचा हक्क व अधिकार नष्ट होवू शकत नाही. त्यामुळे सदर नोंदीविरुध्द वादीने उपविभागीय प्रांत अधिकारी यांचेकडे दाद मागितली आहे. वास्तविक वादी हे दिनांक ३०/१२/२००८ च्या मृत्युपत्राने मालक झालेले आहेत व मालकी हक्काने दावा जमीनीमध्ये व मिळकतीमध्ये वादींचा कब्जा आहे, वहिवाट आहे. दावा मिळकतीमधील काही क्षेत्रात वादीचे ज्वारीचे पिक आहे. प्रतिवादीचा कधीही दावा मिळकतीमध्ये कब्जा नव्हता व नाही. प्रतिवादीच्या नावाची पोकळीस्त नोंद आहे. यातील वादींना प्रतिवादीच्या वरील कृत्याची माहिती दावा जमिनीचे ७/१२ उतारे काढल्यानंतर झाली. प्रतिवादीने दावा मिळकतींना त्याच्या नावाची नोंद करुन वादींना मृत्युपत्राने आलेला हक्क व अधिकार नाकारत आहे. गेल्या आठ दिवसापासून दावा जमीनीतील व मिळकतीमधील वादींच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा चालू केला आहे. दावा जमीनीमध्ये तथाकथित चुकीच्या व बेकायदेशीर नोंदीच्या आधारे बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने कब्जा घालणेचा प्रयत्न चालू केला आहे. प्रतिवादीकडे मनुष्यबळ आहे. त्याच्या जोरावर तो वादींना दावा जमिनीतून हुसकावून लावणेच्या तयारीत आहे. वादीने त्यांना समजावून सांगणेचा प्रयत्न केला पण प्रतिवादी ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. उलट त्यांनी दावा जमिनीच्या ७/१२ सदरी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा कलम १अ यात वर्णन केलेली जमीन विक्री करण्याची अथवा अन्य त-हेने तबदील करण्याची धमकी दिली आहे. वास्तविक प्रतिवादी दावा जमीनीचा मालक नाही, त्याचा कब्जा नाही, वहिवाट नाही त्यामुळे दावा जमीन विक्री करण्याचा किंवा अन्य प्रकारे तबदील करणेचा प्रतिवादीला अधिकार नाही.

०८. वादी हेच दावा जमीनीचे मालक आहेत. त्यांचा मालकी हक्काने कब्जा आहे. त्यामुळे जर प्रतिवादीने दावा जमीन विक्री केली अथवा दावा जमीनीतील वादींच्या वहिवाटीला हरकत अडथळा केला किंवा वादींना दावा जमीनीतून हुसकावून लावले तर वादीचे फार मोठे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यासाठी यातील वादी हेच मृत्युपत्राने दावा जमीन व मिळकतीचे मालक आहेत असे जाहीर होवून मिळणेसाठी व यातील प्रतिवादी अगर त्यांचेकरवे इतर कोणीही दावा जमीनीतील वादीच्या वहिवाटीला हरकत अडथळा करु नये, दावा जमीनीत दांडगाव्याने व जबरदस्तीने कब्जा घालू नये, अगर दावा जमीनीतून वादींना हुसकावून लावू नये. त्याचप्रमाणे दावा जमीनीचे ७/१२ सदरी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा जमीन विक्री करु नये अथवा अन्य त-हेने तबदील करु नये अशी प्रतिवादीविरुध्द निरंतरची ताकीद मिळण्याची विनंती केली आहे.

०९. प्रतिवादी क्र २ यांनी ४१ वर दाव्यास कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र १, ३ ते ६ यांनी निशाणी क्र ५० अन्वये पुरसीस दाखल करुन निशाणी क्र ४१ वरील कैफियत स्विकारली आहे. प्रतिवादींनी दाव्यातील सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादी हा स्वच्छ हाताने कोर्टात आलेला नाही. त्याने अनेक महत्वाच्या बाबी तसेच १३.०१.२००४ रोजीचे तथाकथित मृत्युपत्र दस्ताचा उल्लेख दाव्यात न करता तसेच मे. कोर्टामध्ये दाखल न करता दावा खोटया बनावट मृत्युपत्राचे आधारे दाखल केला आहे. महाराष्ट्र शेती महामंडळाची जमीन फुकटात हडप करणेच्या उद्देशाने प्रतिवादी हेच मयत ममताबाईचे खरे वारस असताना महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या शेती महामंडळाच्या जमीनी संदर्भीच्या निकशाचा अवलंब न करता मौजे एकशिव येथील जमिन गट नं ४०४ पैकी ३.२३ हे.आर ०-०१ हे.आर पैकी २-३७ हे.आर ०-०१ आर पो.ख. व गट नं ४०५ क्षेत्र ०१-४३ हे.आर ००-०३ पो.ख. व गट नं ४६२ चे क्षेत्र ३०-९५ हे.आर ०-२२ पो.ख पैकी १-२२ हे. आर या जमीनी वादी सरकारी अधिका-यावर पुढा-यांमार्फत दबाव आणून नावे

करुन घेतली या जमिनीचे वाटपाचे हेराफेरीमध्ये मंडल अधिकारी यांना देखील निलंबीत केले आहे. त्याबाबत प्रतिवादींनी मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात दाद मागितली आहे. त्याच्या दाव्याचा रे.मु.नं. १२/१४१ हा आहे.

**१०.** मुळात ज्या तथाकथित मृत्युपत्राचे आधारे वादी वारस हक्क ठरावाने मागत आहे. तथाकथित मृत्युपत्राच मुळतच बेकायदेशीर व बोगस आहे. कारण मयत ममताबाई शेवटपर्यंत मौजे दहिगांव येथेच राहत होती. वादीनी तिच्या कधीही सांभाळ केला नाही. तसेच तिला जीवनावश्याक वस्तुंचा पुरवठा केला नाही. तसे कारणही नव्हते कारण प्रतिवादी हे ममताबाईस वारस होते व ममताबाईस सांभाळणेची नैतिक जबाबदारी प्रतिवादीने तंतोतंत शेवटपर्यंत पाळली होती. त्यामुळे वादींची दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. वादींना ममताबाईने दावा जमिनीची कधीही कब्जासह मालकी कधीही दिली नव्हती. अथवा वादीचा दावा जमिनीत कब्जा असण्याचे कारणही नव्हते. उलटपत्री यातील प्रतिवादींना दावा जमीन महाराष्ट्र शासनाच्या जाहीर केलेल्या निकषाला आधीन राहून चौकशी करुन खात्री करुन दिलेली असून कब्जात देवून तशा महसुली दप्तरी नोंदीही प्रतिवादी यांचे नावाच्या झालेल्या आहेत. त्यावरुनही वादीस दावा जमीनत कसल्याही प्रकारे हक्क अधिकर कब्जा इत्यादी नव्हता व नाही. या कारणास्तव व मयत ममताबाईची बनावट मृत्युपत्राचे आधारे वादीचा मालकी हक्क कायद्याने जाहीर करता येणार नाही व तो त्यायोग्य प्रतिवादी विरुध्द निरंतरची ताकीद देता येणार नाही. सबब वादीचा दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्ज खर्चासह रद्द व्हावा व प्रतिवादीस खर्च मिळावा अशी विनंती केली आहे.

**११.** वादी - प्रतिवादींच्या कथनावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीने हे सिद्ध केले आहे काय की, ते मृत्युपत्राद्वारे | नाही.. |

| | | |
|---|---|---|
| | वाद मिळकतीचे मालक बनले आहेत ? | |
| २) | वादीने हे सिद्ध केले आहे काय की, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे जाहीर ठराव मिळण्यास पात्र आहेत ? | नाही.. |
| ३) | वादीने हे सिध्द केले आहे काय की, दावा मिळकतीवर त्यांचा ताबा असून त्याची वहिवाट करतात ? | नाही.. |
| ४) | वादी हे सिद्ध करतात काय की, प्रतिवादींनी त्यांच्या कायदेशीर ताब्यास अनाधिकृत अडथळा केला आहे ? | नाही.. |
| ५) | वादी मनाई हुकूम मिळणेस पात्र आहे ? | नाही.. |
| ६) | काय आदेश व हुकूमनामा ? | **दावा खारीज करण्यात येतो** |

## कारणमिमांसा

**१२.** वादीने त्याच्या कथनाचे पुष्ठयार्थ स्वत:चे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी ११ वर दाखल केले आहे. तोंडी पुराव्याला पुष्टी मिळावी म्हणून मौजे दहिगाव येथील गट नं ९३/३ (नि.क्र. ५९), ९३/१/अ (नि.क्र. ६०) चे ७/१२ उतारे तसेच फेरफार क्र ९६४३, इमारतीच्या जागाबाबतच्या सनदेचा नमुना, ममताबाई धोंडी सावंत यांचे मृत्युपत्र व मृत्युप्रमाणपत्र, ममताबाई धोंडीबा सावंत यांचे ओळखपत्र, ममताबाई धोंडीबा सावंत यांचे रेशनकार्ड, ममताबाई धोंडीबा सावंत यांचे आरोग्यपत्र यांच्या छायांकीत प्रत दाखल केल्या आहेत. तसेच जगन्नाथ कृष्णा सावंत यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहेत. वादीने त्याचा पुढील पुरावा न दिल्याने २८.११.२०२५ रोजी निशाणी क्र ०१ वर आदेश पारीत करुन वादीचा पुरावा बंद करण्यात आला.

**१३.** प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द पुरावा नाही चा आदेश पारीत करण्यात आला.

**मुद्दा क्र.१ ते ६** :-

**१४.** मुद्दा क्र.१ ते ६ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती होवू नये म्हणून ते एकत्रीत चर्चीले आहेत. सदर दावा मिळकती या मयत ममताबाई यांच्या मालकी वहिवाटीची होती. त्यांचे दिनांक २०.०८.२०१२ रोजी निधन झाले असून त्यांचे पती पुर्वीच मयत झाले आहेत. त्यांना कोणतेही आपत्य झालेले नाही. वादीचे वडील विठ्ठल जाधव हे मयत ममताबाई यांचा भाचा असून त्यांच्या पतीचे निधन झाल्यानंतर त्या वादीच्या वडिलांकडे येवून राहिल्या. त्यांचा संपूर्ण सांभाळ वादी व त्यांच्या वडीलांनी केला आहे. त्यांना कोणीही जवळचे वारस नसल्याने दिनांक ३०.१२.२००८ रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र दस्त क्रमांक ३१९४/२००८ तयार केला. सदर मृत्युपत्राअन्वये त्यांनी दावा मिळकत वादींना दिली आहे. वादी हे मृत्युपत्राअन्वये दावा मिळकतीचे मालक झाले असून दावा मिळकत त्यांच्या कब्जे वहिवाटीस आहे. प्रतिवादी यांचा मयत ममताबाई यांच्याशी काहीही संबंध नाही. त्यांनी ममताबाई यांची मृत्युची नोंद करुन दावा मिळकतीबाबत खोटे प्रतिज्ञापत्र तयार केले आहे. त्यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन फेरफार क्र ६९४३ अन्वये दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी त्यांच्या नावाची बेकायदेशीर नोंद करुन घेतली आहे. त्यांनी कोणत्याही सक्षम न्यायालयाचा वारस दाखला घेतलेला नाही. सदर नोंद अन्वये प्रतिवादी हे वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा मिळकती विक्री करण्याची धमकी देत आहेत. वादी हे मृत्युपत्राने दावा मिळकतीचे मालक झाले आहेत असे जाहीर होवून मिळणेसाठी तसेच वादीच्या कब्जे वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये तसेच जमीन विक्री करु नये या करीता प्रस्तुत दावा

दाखल केला आहे असे वादीचे म्हणणे आहे त्यामुळे सदर बाब सिद्ध करण्याची जबाबदारी वादीच्या खांदयावर आहे. सदर सिद्धीभारातुन मुक्त होण्यासाठी त्यांने नि.क्र. ११ वर स्वत:चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन दाव्यातील कथने पुर्न:कथित केले आहेत.

**१५.** प्रतिवादी यांनी वादीचा उलटतपास घेतला नाही त्यामुळे त्यांच्या विरुध्द उलटतपास नाही चा आदेश पारीत करण्यात आला.

**१६.** याउलट प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीने खोटया व बनावट मृत्युपत्राअन्वये प्रस्तुत दावा दाखल केला असून महाराष्ट्र शेती महामंडळाची जमीन हडपण्याच्या उद्देशाने गट क्र ४०४, गट क्र ४०५ व गट क्र ४६२ या मिळकती सरकारी अधिका-यांवर पुढया-यांमार्फत दबाव आणून स्वत:च्या नावावर करुन घेतल्या आहेत. त्याबाबत प्रतिवादी यांनी रेमुनं १२/१४१ दाखल केला आहे. वादीने दिनांक १३.०१.२००४ रोजीच्या मृत्युपत्राचा दाव्यात उल्लेख केला नाही. वादी ज्या मृत्युपत्राच्या आधारे वारस हक्क ठरावाने मागत आहे ते मुळात बेकायदेशीर व बोगस आहे. कारण वादीने कधीही मयत ममताबाई यांचा सांभाळ केला नाही. याउलट प्रतिवादी हे मयत ममताबाई यांचे वारस असून त्यांनी शेवटपर्यंत त्यांचा सांभाळ केला आहे. दावा मिळकतीवर वादी यांचा हक्क अधिकार व कब्जा नाही.

**१७.** वादी व प्रतिवादी यांनी युक्तीवाद न केल्याने त्यांच्या विरुध्द युक्तीवाद नाही चा आदेश पारीत करण्यात आला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरून असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाईहुकूम होवून मिळणेकामी दाखल केला आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता दावा मिळकती या मयत ममताबाई ध

ोंडी सावंत यांच्या नावावर असल्याचे दिसून येते. वादी व प्रतिवादी यांच्या कथना. प्रमाणे त्यांनी मयत ममताबाई यांचा सांभाळ केला असून ते कायदयाने त्यांचे वारस आहेत. वादी हे मयत ममताबाईचे वारस असून त्यांनी वादीच्या नावावर नोंदणीकृत मृत्युपत्र करुन ठेवले होते ही बाब वादीने ठोस पुराव्यानिशी शाबीत करणे गरजेचे होते. परंतु वादीने अभिलेखावर मृत्युपत्राची छायांकीत प्रत दाखल केली आहे. वादी यांनी स्वत:च्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्राशिवाय इतर कोणतेही साक्षीदार तपासले नाहीत. मयत ममताबाई यांनी वादीच्या नावे नोंदणीकृत मृत्युपत्र तयार केले आहे ही बाब वादीने शाबीत करणे गरजेचे आहे. परंतू वादीने मृत्युपत्राची मुळ प्रत किंवा त्यावरील कोणतेही साक्षीदार तपासले नाहीत. त्यामुळे वादी मृत्युपत्र शाबीत करण्यास असफल ठरला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे वादी हे मयत ममताबाई यांचे कायेदशीर वारस आहेत. परंतु त्यांनी वारसप्रमाणपत्रही अभिलेखावर दाखल केले नाही. जेणेकरुन वादी हे मयत ममताबाई यांचे वारस असून त्यांनी वादीच्या हक्कात मृत्युपत्र तयार केले आहे, असा निष्कर्ष काढता येईल.

**१८.** वादीच्या कथनाप्रमाणे नोंदणिकृत मृत्युपत्राअन्वये दावा मिळ. कतीवर त्यांचा ताबा व वहिवाट असून ते दावा मिळकतीचे मालक झाले आहेत. तसेच त्यांच्या कब्जे वहिवाटस प्रतिवादी हरकत अडथळा करत आहेत. ही बाब देखील वादीने ठोस पुराव्यानीशी शाबीत केले नाही. दावा मिळकतीवर वादीचा ताबा आहे हे दाखविण्याकरीता वादीने अभिलेखावर कोणतेही कागदपत्रे दाखल केली नाहीत. वादीच्या कथनाप्रमाणे त्याच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी हे हरकत अडथळा करत आहेत हे दाखविण्याकरीता वादीने आजतागायत प्रतिवादी विरुध्द तक्रारी केल्याचे दिसुन येत नाही. जेणे करुन प्रतिवादी हे वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत असा निष्कर्ष काढता येईल.

**१९.** जरी वादीचा तोंडी पुरावा हा विना आव्हानित असला तरी वादीने त्या संदर्भाने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच लगत कब्जेदार अथवा इतर कोणाचा तोंडी पुरावा दिलेला नाही. याशिवाय दावा दाखल झाल्यापासुन ते आजपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीचे हस्तांतरण केले अथवा तसा प्रयत्न केला अशी तक्रार वादीने केलेली नाही. या बाबी वादीस पुष्ठयर्थ, तोंडी व कागदोपत्री पुराव्याअभावी शाबीत करता आलेल्या नाहीत हे स्पष्ट होते. <u>**सबब मी अनुक्रमे मुद्दा क्र. १ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे**</u> व **मुद्दा क्र.६ करीता** मी सविस्तर आदेश खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. दावा खर्चासह खारीज करण्यात येतो.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.**

Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2026.03.23 17:26:42 +0530

ठिकाण :- माळशिरस
दिनांक :- २३.०३.२०२६

**( एम.जे.गायकवाड)**
४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
माळशिरस, जि. सोलापूर.

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 23 / 03 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 23 / 03 / 2026. |